# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

मुख्य कार्यालय

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४०० ००१ ☎ २२६७ ०२१० /१४८ /२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

**माझगांव कार्यालय**

विक्रीकर भवन, ९ वा मजला,रुम नंबर ९१५, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई ४००२०३ ☎ २३७४२१९१ फॅक्स : २३७८१०६१

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 ☎ 23742191 Fax : 23781061

**ई-मेल sec_mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in**


## महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०१०

**अधिसूचना क्रमांक : ३७४(१)दोन(२)/ २०१०/तीन**

जाहिरात क्रमांक - ०१/२०१०, दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१० नुसार राज्य शासनाच्या सेवेतील महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा, गट-ब संवर्गातील सहायक अभियंता (विद्युत) श्रेणी-२ च्या २७४ पदावरील नियुक्तीकरीता आयोगामार्फत दिनांक २८ नोव्हेंबर, २०१० रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा -२०१० मध्ये अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची **मुख्य परीक्षा दिनांक ९ व १० एप्रिल, २०११ रोजी औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे** या ठिकाणी घेण्यात येईल. प्रस्तुत परीक्षा खालील दोन टप्प्यात घेण्यात येईल :-

(१) लेखी परीक्षा :- एकूण ६०० गुण. (२) मुलाखत :- १०० गुण.

**२. परीक्षा शुल्क :**

**२.१** अमागास - ₹ ४१०/- **२.२** मागासवर्गीय - ₹ २१०/-

**२.३** सदर शुल्क ऑनलाईन अर्जांची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल.

**३. मुख्य परीक्षेस प्रवेश :-**

**३.१** महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा -२०१० च्या निकाला आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि जाहिरातीतील शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**३.२** जे उमेदवार पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करताना जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे विहित शैक्षणिक अर्हता धारण करीत नव्हते, परंतु **दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी** किंवा त्यापूर्वी शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत, अशा उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक ऑनलाईन पद्धतीने नोंदविणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**३.३** पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनी आयोगाच्या www.mpsconline.gov.in या वेबसाईटवर स्वतःच्या युजर आयडी व पासवर्डद्वारे प्रवेश (Login) केल्यानंतर Apply Exam / Post या बटणावर क्लिक करावे. त्यानंतर महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा- २०१० वर Apply केल्यावर उमेदवारास त्याच्या पसंतीचे परीक्षा केंद्र (औरंगाबाद, मुंबई, नागपूर, पुणे) निवडावे लागेल. परीक्षा केंद्र निवडल्यानंतर तसेच दिनांक व ठिकाण नमूद केल्यावर Submit to MPSC वर क्लिक करुन आयोगास माहिती सादर करावी.

**३.४** वरीलप्रमाणे आयोगास माहिती सादर केल्यानंतर विहित परीक्षा शुल्काचा भरणा करण्यासाठी Print Challan या बटनावर क्लिक करावे व चलनाची प्रत घ्यावी. सदर चलनावर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक परीक्षा शुल्क चलनासह भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयीन वेळेत रोखपालाकडे सादर करावे व बँकेकडून त्याच वेळी चलनाची प्रत घ्यावी.

**३.५** भारतीय स्टेट बँकेमध्ये रक्कम भरल्यानंतर बँकेकडून चलनावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Transaction ID ची नोंद पुन्हा ऑनलाईन पद्धतीने अचूकरित्या केल्याशिवाय मुख्य परीक्षेच्या प्रवेशाबाबतची कार्यवाही पूर्ण होत नाही.

**३.६** बँकेमध्ये विहित परीक्षा शुल्काचा चलनाद्वारे भरणा केल्यानंतर चलनावर प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद खालीलप्रमाणे करावी :-

**(१)** बँकेमध्ये रकमेचा भरणा केल्यावर शासकीय कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसानंतर स्वतःच्या युजर आयडी व पासवर्डद्वारे प्रवेश (Login) करुन Apply Exam/Post या बटणावर क्लिक करावे व Update Transaction ID या बटणावर क्लिक करुन बँकेकडून प्राप्त झालेला Transaction ID अचूकपणे नोंदवावा. बँकेकडून प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद अचूकपणे करण्यात आली असेल तरच उमेदवार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरेल व पुढील प्रक्रिया करता येईल. अन्यथा पुढील कोणतीही कार्यवाही होऊ शकणार नाही.

**(२)** Transaction ID ची नोंद अचूकपणे केल्यानंतर व नोंदविलेला Trasaction ID वैध असल्यास उमेदवाराला संबंधित जिल्हाकेंद्रावरील आयोगाने निश्चित केलेले उपकेंद्र निवडावे लागेल.

**(३)** उपकेंद्र निवडल्यानंतर उमेदवारास त्याच्या प्रवेशप्रमाणपत्राची प्रत प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच, त्याच्या नोंदणीकृत ई-मेल वर प्रवेशपत्र प्राप्त होईल. सदर प्रवेशपत्राची प्रत घ्यावी.

**(४)** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**(५)** प्रस्तुत परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पद्धतीने माहिती सादर करणा-या उमेदवारांना अर्जाची प्रत अथवा कोणत्याही प्रकारची कागदपत्रे अथवा ऑनलाईन अर्ज प्रणालीमध्ये असलेल्या शपथपत्राव्यतिरिक्त कोणतेही वेगळे शपथपत्र/ॲफिडेव्हीट आयोगाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

४. विहित पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक ३१ मार्च, २०११** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

५. चलनाद्वारे शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये भरल्यानंतर बँकेकडून प्राप्त होणारा Transaction ID **दिनांक २ एप्रिल, २०११** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

६. Transaction ID ची नोंद अचूकरित्या,विहित पद्धतीने व विहित कालावधीत न करणाऱ्या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

७. सदर अधिसूचना आयोगाच्या **www.mpsc.gov.in** व **www.mpsconline.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

मुंबई :
दिनांक : १५ मार्च, २०११.

**दी. प्र. मिरजकर**
उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.**

**महत्वाचे**

| अ.क्र. | जाहिरात | ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | परीक्षेचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जाहिरात क्रमांक : ५५/२०११- अधिसेविका, वर्ग-२, श्रेणी- ३, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय. | २४ मार्च, २०११ | --- |
| २ | जाहिरात क्रमांक : ५६/२०११ - सहायक संचालक - नगररचना, महाराष्ट्र नगर विकास व मुल्यनिर्धारण सेवा, गट-अ (राजपत्रित) | ०३ एप्रिल, २०११ | --- |